WWW.LOKSATTA.COM लोकसत्ता

जेरेमी डोकू बेल्जियम संघात दाखल

रेन्टन : अनुभवी आक्रमक खेळाडू जेरेमी डोकू पुन्हा बेल्जियम संघात दाखल झाला आहे. आपल्या पहिल्या पाल्याच्या जन्मासाठी तो लंडन येथे गेला होता. त्यामुळे त्याला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील बेल्जियम संघाच्या इराणविरुद्ध रविवारी झालेल्या सामन्यात मुकावे लागले होते. यावेळी तो आजारीही होता. मात्र, डॉक्टरांच्या परवानगीनंतर तो लंडनला गेला. आता तो अमेरिकेत परतला असून पुन्हा बेल्जियम संघाशी जोडला गेला आहे.

१० यंदाच्या विश्वचषक स्पर्धेत ४० वर्षे किंवा त्याहून अधिक वयाच्या खेळाडूंनी आतापर्यंत १० सामने खेळले आहेत. विश्वचषक इतिहासातील कोणत्याही पूर्वीच्या आवृत्तीपेक्षा हा आकडा मोठा आहे.

इंग्लंडचे आक्रमण निष्फळ

घानाच्या भक्कम बचावापुढे गोलशून्य बरोबरीवर समाधान

१३ इंग्लंडला विश्वचषक स्पर्धेच्या इतिहासात सर्वाधिक १३व्यांदा गोलशून्य बरोबरीवर समाधान मानावे लागले आहे. या यादीत ब्राझील दुसऱ्या स्थानावर असून त्यांनी नऊ वेळा गोलशून्य बरोबरी नोंदवली आहे.

१२ इंग्लंड संघाची आंतरराष्ट्रीय फुटबॉलमधील (मैत्रीपूर्ण सामने वगळून) सलग ९२ विजयांची मालिका खंडित झाली. यापूर्वी ऑक्टोबर २०२४ मध्ये नेशन्स लीगच्या लढतीत इंग्लंडला ग्रीसने १-२ असे पराभूत केले होते.

घानाला पेनल्टी डावलली?

सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात इंग्लंड संघ सातत्याने आक्रमण करत होता. गोलरक्षक जॉर्डन पिकफर्ड वगळता इंग्लंडचे सर्व खेळाडू घानाच्या रक्षात होते. मात्र यामुळे घानालाही प्रतिआक्रमणाची संधी निर्माण झाली. आक्रमक प्रिन्स क्वाबेना एडू याला इंग्लंडचा बचावपटू एझी कोन्सा याने गोलकक्षात पाडले. या वेळी कोन्सा चेंडूपर्यंत पोहोचण्याच्या प्रयत्नात होता, मात्र त्याचा चेंडूला स्पर्श झालाच नाही, तो थेट एडूच्या गुडघ्यावर जाऊन आदळला. या वेळी घानाला पेनल्टी मिळण्याची शक्यता होती. मात्र, घानाच्या अपीलकडे दुर्लक्ष करत पंचांनी खेळ सुरू ठेवण्याचा निर्णय घेतला.

जर्मन प्रशिक्षक थॉमस टुकेल यांच्या मार्गदर्शनाखाली खेळताना इंग्लंडने सलामीच्या सामन्यात क्रोएशियाविरुद्ध संथ सुरुवातीनंतर उत्तरार्धात अप्रतिम खेळ केला होता. त्या सामन्यातील ४-२ अशा विजयानंतर इंग्लंड संघाकडून अपेक्षा वाढल्या होत्या. मात्र, घानाच्या शिस्तबद्ध बचाव व संघटित खेळापुढे कर्णधार हॅरी केन, जुड बेलिंगहॅम यांच्यासह इंग्लंडचे सर्वच आक्रमक अपयशी ठरले. इंग्लंडने तब्बल ७८ टक्के वेळ चेंडूचा ताबा आपल्याकडे राखला. त्यांनी गोलच्या दिशेने १९ फटकेही मारले; परंतु त्यांचे सर्व प्रयत्न फोल ठरले.

इंग्लंडने आक्रमणावर भर दिला, पण त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. सामन्याच्या ५७व्या मिनिटापर्यंत इंग्लंडला लक्ष्यावर एकही फटका मारता आला नव्हता. वाउलट घानाने बचाव भक्कम ठेवतानाच प्रतिआक्रमणाच्या माध्यमातून काही धोकादायक संधी निर्माण करत इंग्लंडची परीक्षा घेतली.

इंग्लंडच्या आक्रमणाला धार नसल्याने प्रशिक्षक टुकेल यांनी उत्तरार्धात पाच बदली खेळाडू वापरले. दुखापतीतून सावरत असलेल्या बुकायो साकाला मैदानात उतरवण्यात आले, तर बेलिंगहॅमच्या जागी मॉर्गन रॉजर्सला संधी देण्यात आली. तसेच गेल्या सामन्यात गोल करणारा मार्कस रॅशफोर्डही मैदानात आला. त्यानंतर इंग्लंडच्या आक्रमणाला काहीशी गती मिळाली. साकाने मारलेल्या जोरदार फटक्याचा घानाचा गोलरक्षक बेंजामिन असारे याने अप्रतिम बचाव करत गोल रोखला. त्यानंतर अन्य बदली खेळाडू निको ओरायली याचा हेडर थेट क्रॉसबारला लागला. मार्क गुएही याचा हेडरही गोलरेषेवरून वाचवण्यात आला. अखेरच्या काही मिनिटांत इंग्लंडने घानावर दडपण राखले, परंतु गोलखाते उघडता आले नाही.

वृत्तसंस्था, फॉक्सबोरो

सलामीला तुल्यबळ क्रोएशियाविरुद्ध प्रभावी आक्रमक खेळ करणाऱ्या इंग्लंडला विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील दुसऱ्या सामन्यात घानाचा भक्कम बचाव भेदण्यात अपयश आले. बॉस्टन स्टेडियमवर झालेल्या 'ए्ल' गटातील सामन्यात इंग्लंडला गोलशून्य बरोबरीवर समाधान मानावे लागले. या निकालामुळे इंग्लंडचे बाद फेरीतील स्थान अद्याप निश्चित झाले नसून आता त्यांना अखेरच्या साखळी सामन्यात पनामाविरुद्ध किमान बरोबरीची नोंद करावी लागेल.

इंग्लंडने आक्रमणावर भर दिला, पण त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. सामन्याच्या ५७व्या मिनिटापर्यंत इंग्लंडला लक्ष्यावर एकही फटका मारता आला नव्हता. वाउलट घानाने बचाव भक्कम ठेवतानाच प्रतिआक्रमणाच्या माध्यमातून काही धोकादायक संधी निर्माण करत इंग्लंडची परीक्षा घेतली.

इंग्लंडच्या आक्रमणाला धार नसल्याने प्रशिक्षक टुकेल यांनी उत्तरार्धात पाच बदली खेळाडू वापरले. दुखापतीतून सावरत असलेल्या बुकायो साकाला मैदानात उतरवण्यात आले, तर बेलिंगहॅमच्या जागी मॉर्गन रॉजर्सला संधी देण्यात आली. तसेच गेल्या सामन्यात गोल करणारा मार्कस रॅशफोर्डही मैदानात आला. त्यानंतर इंग्लंडच्या आक्रमणाला काहीशी गती मिळाली. साकाने मारलेल्या जोरदार फटक्याचा घानाचा गोलरक्षक बेंजामिन असारे याने अप्रतिम बचाव करत गोल रोखला. त्यानंतर अन्य बदली खेळाडू निको ओरायली याचा हेडर थेट क्रॉसबारला लागला. मार्क गुएही याचा हेडरही गोलरेषेवरून वाचवण्यात आला. अखेरच्या काही मिनिटांत इंग्लंडने घानावर दडपण राखले, परंतु गोलखाते उघडता आले नाही.

पनामावरील विजयासह क्रोएशियाचे आव्हान शाबूत

टोरंटो : आन्टे बुदिमिरने उत्तरार्धात केलेल्या गोलच्या जोरावर क्रोएशियाने पनामावर १-० असा निसटता विजय मिळवत विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील आपले आव्हान शाबूत ठेवले. त्याच वेळी सलग दुसऱ्या पराभवामुळे पनामा संघ मात्र साखळीतच गारद झाला. तसेच पनामाची विश्वचषक स्पर्धेतील पहिल्या गुणाची प्रतीक्षाही कायम राहिली.

क्रोएशियाला सलामीच्या लढतीत इंग्लंडकडून पराभव पत्करावा लागला होता. मात्र, दुसऱ्या लढतीत त्यांनी अधिक दर्जेदार खेळ केला. 'बीएमओ फिल्ड' स्टेडियमवर झालेल्या लढतीत क्रोएशियाला पूर्वार्धात गोलच्या संधी निर्माण करण्यासाठी संघर्ष करावा लागला. पनामाचा भक्कम बचाव भेदणे त्यांना अवघड जात होते. मध्यंतराच्या गोलशून्य बरोबरीनंतर क्रोएशियाचे प्रशिक्षक इनातको डालिच यांनी डोन आक्रमक बदल केले. त्यापैकी एक बदल लगेचच यशस्वी ठरला. जोसिप स्टानिशिच्याच आक्रमक पासवर बुदिमिरने (५४व्या मिनिटाला) चेंडू जाळ्यात धाडत क्रोएशियाला आघाडी मिळवून दिली. मैदानात आल्याच्या चारच मिनिटांत बुदिमिरने गोल साकारला. त्यानंतर तीन मिनिटांनी क्रोएशियाला आघाडी वाढवण्याची संधी होती. कर्णधार लुका मॉड्रिचने दिलेल्या पासवर मार्को पासालिचने फटका मारला, पण पनामाचा गोलरक्षकाने तो अडवला.

बँक ऑफ इंडिया
नाव बँकिंग पलिकडचं

आंचलिक कार्यालय-विदर्भ अंचल,प्लॉट नं. 2072,दुसरा माळा,सुमती पॅलेस, महाबीर उद्यान समोर रामनगर, वर्धा-442001 फोन 07152-245337, 245338 ई मेल : ard.vldarbha@bankofindia.bank.in

सरफेसी ॲक्ट 2002 अंतर्गत स्थावर मालमत्तांची मेगा स्टार ई-लिलावाद्वारे विक्री सूचना

दि सिक्युरिटायझेशन अँन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट्स अँन्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 तसेच सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट रुल्स, 2002 च्या नियम 8(2) च्या तरतुदीसह वाचण्यात आलेल्या नियमांतर्गत स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई-लिलाव विक्री सूचना याद्वारे सर्वसाधारण जनतेस विशेषत: खालील कर्जदारांना /सह-कर्जदारांना /जामीनदारांना सूचना देण्यात येते की, बँक ऑफ इंडियाकडे (सुरक्षित धनको) तारण असलेल्या तसेच बँक ऑफ इंडियाच्या प्राधिकृत अधिका-यांनी ज्याचा सांकेतिक आणि भौतिक ताबा घेतलेला आहे. अशा खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तांची विक्री "जे आहे जेथे आहे" तत्वावर, "जे काही आहे ते आहे" तत्वावर आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर बँक ऑफ इंडियाकडे सुरक्षित मालमत्ता तारण ठेवून घेतलेल्या व खाली नमूद केलेल्या थकबाकीची संबंधित कर्जदार/जामीनदारांकडून वसुली करण्यात येणार आहे. आरक्षित किंमत आणि बयाणा रक्कम) ईएमडी (प्रत्येक सुरक्षित मालमत्तेसमोर दर्शविण्यात आली आहे. विक्री ही निम्नस्वाक्षरीकाराकडून ई-लिलाव प्लॅटफॉर्मद्वारे खाली नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल.

ई-लिलावाची तारीख आणि वेळ : 28/07/2026 सकाळी 11.00 ते सायंकाळी 05.00 वाजेपर्यंत

(समाप्तीपूर्वी 10 मिनिटे आधी बोली सदर झाल्यास बोलीच्या मुदत वाढीच्या अटीसह)

(मालमत्तेच्या तपासणीसाठी विनंती ARD.Vldarbha@bankofindia.bank.in या ई-मेल आयडीवर आणि /किंवा श्री शुभम मस्के मो. 8237771144, श्री स्वप्नील अग्रवाल मो.8888334383 यांच्याशी संपर्क साधून करता येईल.)

कर्जदार, सह-कर्जदार, प्रोपायटर गहाणदार, जमानतदाराचे नांव, शाखेचे नाव, मालमत्तेचा आयडी	संपत्तीचे विवरण	एकूण थकबाकी	ताबा प्रकार	नवीन लिलावाची सुरुवातीची किंमत रु.	अनामत रक्कम (ईएमडी) रु.	ई-लिलावाची तारीख आणि वेळ
कर्जदार/गहाणदार : मे.वैष्णवी डिझेल प्रो.श्री अनिल मारोतराव लाकडे BKIDWANIVD1 शाखा : वणी	जागेचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि स्टॅन्डर्ड प्लॉट नं. 30, सर्वे नं.9/2, गट नं.105, वरोरा लेआऊट, तोटावार कोल डेपोट च्या मागे, कळमना रोड, मौजा चिखलगांव, तह.वणी जि. यवतमाळ अंदाजे एरिया 1735.05 स्के.फीट श्री अनिल मारोतराव लाकडे (कर्जदार- गहाणदार) यांच्या नावाने	रु. 03.88 लक्ष O/S +मालमत्तेच्या ताब्याच्यापासून पुढीआय +इतर आनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 2,35,000/-	रु. 23,500/-	28.07.2026 सकाळी 11.00 ते दुपारी 05.00 वाजेपर्यंत
कर्जदार/गहाणदार : मे.वैष्णवी डिझेल प्रो.श्री अनिल मारोतराव लाकडे BKIDWANIVD2 शाखा : वणी	जागेचा सर्व भाग आणि तुकडा जागा आणि स्टॅन्डर्ड प्लॉट नं. 31, सर्वे नं.288/1 आणि 289, गट नं.280, मस्की लेआऊट, वर्शि मंजिल वेडींग शॉप जवळ,हुडीयन पेट्रोल पंप समोर, मौजा आणि तह.मारेगांव,जि.यवतमाळ अंदाजे एरिया 1743 स्के.फीट श्री अनिल मारोतराव लाकडे (कर्जदार-गहाणदार) यांच्या नावाने	रु. 03.98 लक्ष O/S +मालमत्तेच्या ताब्याच्यापासून पुढीआय +इतर आनुषंगिक खर्च	भौतिक	रु. 2,36,000/-	रु. 23,600/-	28.07.2026 सकाळी 11.00 ते दुपारी 05.00 वाजेपर्यंत
कर्जदार/गहाणदार : श्री अरविंद शंकरराव सोनटक्के BKIDWARDHASONTAKKE शाखा : वर्धा	जागेचा सर्व भाग आणि तुकडा प्लॉट नं.25 वर उभारलेले व बसवलेले दुमजली निवासी घर, इतर बांधकाम, शेड्स आणि फिक्स्चर्स, सर्वे नं. 361/2, मौजा सालोड, मौजा नं. 135, घर नं. 567, लोखंडे लेआऊट, कारमेल शाळे जवळ, वसीम हॉटल च्या मागे, यवतमाळ- देवळी रोड, सालोड (ही), तह. आणि जि. वर्धा अंदाजे क्षेत्रफळ 185.87 स्के.मि. (प्लॉट), 97.36 स्के.मि. (बिल्ट अप) श्री अरविंद शंकरराव सोनटक्के (कर्जदार-गहाणदार) यांचे नावाने	रु. 31.66 लक्ष O/S +एनपीए च्या ताब्याच्यापासून पुढीआय +इतर आनुषंगिक खर्च	सांकेतिक	रु. 40,05,000/-	रु. 4,00,500/-	28.07.2026 सकाळी 11.00 ते दुपारी 05.00 वाजेपर्यंत

ई-लिलावाच्या अटी आणि शर्ती खालीलप्रमाणे आहेत :

1) ई-लिलाव "जे आहे जेथे आहे, आणि " जे काही आहे ते आहे आणि "ज्या स्थितीत आहे तसे आहे" तत्वावर ऑनलाईन द्वारे होईल.

2) पुढील तपशिल, प्रक्रिया पूर्तता, अटी आणि शर्ती डाऊनलोड करुन घेण्यासाठी कृपया https://bankofindia.bank.in ला भेट द्या.

a) ई-लिलाव सेवा पुरवठा दारांच्या वेबसाईटच्या पत्ता : https://baanknet.com/. बोलीदार हे https://baanknet.com/ येथे भेट देऊ शकतात. जेथे बोलीदारांसाठी मागसूची उपलब्ध आहे. ई-लिलावात भाग घेण्यासाठी बोलीदारांनी खालील औपचारिकता आगाऊ पूर्ण करणे आवश्यक आहे.

टप्पा - 1: बोलीदारांची नोंदणी बोलीदारांनी आपला मोबाईल क्रमांक आणि ई-मेल आयडीसह ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर) लिंक वर देण्यात आलेली आहे. (नोंदणी करणे आवश्यक आहे.

टप्पा - 2 : केवायसी पडताळणी- बोलीदारांनी आवश्यक केवायसी कागदपत्रे फक्त डिजीलॉकर अपलोड करावेत. केवायसी कागदपत्रांची पडताळणी डिजीलॉकर द्वारे केली जाईल.

टप्पा - 3 : बीडर वॉलेटमध्ये ईएमडी रकमेचे हस्तांतरण : रकमेचे हस्तांतरण ऑनलाईन -ऑनलाईन ने एनईफटी/हस्तांतरण ई-लिलाव पलेटफॉर्मवर जनरेट झालेल्या चलनद्वारे केले जाईल.

टप्पा - 4 : बोली प्रक्रिया आणि बोली निकाल: इच्छुक बोलीदार टप्पा 1, 2 व 3 पूर्ण केल्यानंतर ई-लिलाव प्लॅटफॉर्मवर ऑनलाईन बोली लावू शकतात. कृपया नोंद घ्या की, टप्पा 1 ते 4 पर्यंतची कार्यवाही ई-लिलाव तारखेपूर्वीच बोलीदारांनी पूर्ण करावेत.

3) अधिकृत अधिका-यांच्या सर्वोत्तम ज्ञान आणि माहिती प्रमाणे, स्थावर मालमत्तांवर कोणताही ऋणभार नाही. तथापि, इच्छुक बोलीदारांनी लिलावासाठी देवलेल्या मालमत्तांवरील ऋणभार, नामनिर्देशन आणि दावे /अधिकार, देणी /मालमत्तेला होणारी बाधा हयाची स्वतंत्रपणे चौकशी, त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी करावी. ई-लिलावाची जाहिरात प्रसिध्द होणे म्हणजे कुणाविषही वचनबध्दता असणे किंवा बँकेचे कोणत्याही प्रकारचे प्रतिनिधित्व करत असल्याचे समजण्यात येवू नये. मालमत्तांची विक्री बँकेला ज्ञात असलेल्या आणि अज्ञात असलेल्या सद्यास्थिती आणि आगामी बोजासह /भारासह करण्यात येईल. विक्री करण्याचा हेणा-या मालमत्तांच्या संदर्भात ऑनलाईन बोली सादर करण्यात आल्यानंतर कोणत्याही स्वरुपाचा दाव्याचा विचार केला जाणार नाही.

4) बोलीदारांनी बोली सादर करण्यापूर्वी मालमत्तेच्या संदर्भात पाहणी करुन स्वतःची खात्री करुन घेणे आवश्यक आहे. देण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार अंबंधित अधिकारी यांच्याशी संपर्क करुन मालमत्तेची पाहणी करता येईल. स्थावर मालमत्तांच्या पाहणीसाठी दिनांक : 06.07.2026 रोजी सकाळी 11.00 ते सायंकाळी 4.00 वाजेपर्यंत असून पाहणी करण्यासाठी संबंधित बँकेच्या शाखा प्रमुखांशी/संबंधित अधिकारी ज्याचा तपशील उपरोक्त देण्यात आलेला आहे. त्यानुसार संपर्क करुन पूर्वपरवानगी घेण्यात यावी.

5) बोली केवळ ऑनलाईन प्रक्रियेद्वारेच सादर करण्यात याव्यात.

6) बोलीदारांनी लिलावाच्या सर्व अटी आणि शर्ती वाचल्या असून, त्यांना त्या मान्य असल्याचे समजण्यात येईल.

7) सादर करायची बोली रक्कम ही राखीव मूल्याच्या रकमेपेक्षा अधिक रकमेची असायी आणि बोलीदारांना आपली बोली रु.10,000/- (रु.दहा हजार मात्र) च्या पटीमध्ये वाढवता येईल.

8) यशस्वी बोलीदारांच्या बयाणा रक्कम (ईएमडी) ही विक्रीच्या रकमेचा भाग म्हणून जमा करुन घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदारांच्या बयाणा रकमेची (ईएमडी) परताव करण्यात येईल.

9) बँकांच्या प्रतिकामच ताब्यात असलेल्या मालमत्तेच्या बाबतीत जिल्हा दंडाधिकारी तर्फे /जिल्हा न्यायालय तर्फे भौतिक ताबा मिळाल्यानंतरच मालमत्तेचा भौतिक ताबा यशस्वी बोलीदाराला सुपूर्द केला जाईल.

10) बयाणा रक्कमेच्या (ईएमडी) देवीघर किंवा बोलीमध्ये जमा केलेल्या कुठल्याही रकमेवर कुठल्याही प्रकारचा व्याज दिले जाणार नाही. यशस्वी बोलीदारांना विक्रीच्या रकमेच्या 25% रक्कम, ज्याममध्ये भरणा करण्यात आलेल्या बयाणा रकमेचा समावेश असून ताबडतोब त्याच दिवशी किंवा काही कारणाशी कामकाजाच्या दुस-या दिवशी त्याचा भरणा करावा लागेल. खरेदी किमत शिल्लक रक्कम विक्रीची स्वीकृती/पुष्टी केल्याच्या 15 दिवसांच्या आत जमा करणे आवश्यक आहे. ते करण्यास अपयशी ठरल्यास बँक यशस्वी बोलीदाराने जमा केलेली रक्कम जप्त करण्यास स्वतंत्र आहे.

11) वेबसाईटवरील लिलावामध्ये सहभाग आणि बोली लावणे हे असे मानले जाईल की बोली लावनाऱ्याने लावलेल्या बोलीस संबंधित अटी आणि शर्ती स्विकारल्या आहेत.

12) कोणत्याही प्रकारच्या इंटरनेट नेटवर्की अडचण/वीजेचे जाणे किंवा अन्य कोणतेही तंत्रज्ञान अकार्यक्षम होणे यांस प्राधिकृत अधिकारी /बँक ऑफ इंडिया ई-सेवा पुरवठादार जबाबदार राहणार नाहीत. असे प्रसंग होऊन नयेत यासाठी इच्छुक बोलीदारांना विनंती करण्यात येत आहे कि त्यांनी तांत्रिकदृष्ट्या सक्षम असावे आणि योग्य असा पॉवर बॅकअप त्यांच्याकडे असावा.

13) यशस्वी बोलीदारांच्या द्वारे निश्चित झालेल्या विक्री रकमेचा भरणा बँकेकडे करण्यापूर्वी यशस्वी बोलीदाराकडून आयकर कायदा 1961 च्या कलम 194-1 ए च्या अंतर्गत आणि टीडीएस च्या भरणा, बोली रकमेच्या उर्वरित 75% टक्के रकमेचा भरणा करताना करणे गरजेचे आहे. यशस्वी खरेदीदाराला लागू असणारे मुद्रांक शुल्क, नोंदणीकरण शुल्क, अन्य प्रासंगित शुल्क, संबंधानिक शुल्क किंवा अशी असंबंधानिक शुल्क किंवा देणी इत्यादीचा भरणा करावा लागेल.

14) कोणतेही कारण न देता, कोणत्याही टप्प्यावर ई-लिलावातील कोणतेही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारणे किंवा नाकारणे किंवा ई-लिलाव तहकूब करणे /पूढे ढकलणे/ रदद करणे किंवा लिलाव प्रक्रियेतून कोणतीही मालमत्ता मागे घेणे याचा संपूर्ण अधिकार प्राधिकृत अधिकारी/बँकेकडे असेल. उपरोक्त परिशिष्टात नमूद केलेल्या सुरक्षित मालमत्तांचा तपशील प्राधिकृत अधिका-यांच्या माहितीनुसार असून यामधील कोणतीही चूक, चुकीचे विधान किंवा त्रुटी याला प्राधिकृत अधिकारी उत्तरदायी नसतील.

15) विक्रीचे प्रमाणपत्र हे केवळ खरेदीदाराच्या/अर्जदाराच्या नावे जारी करण्यात येईल व ते अन्य कोणाच्याही नावे करण्यात येणार नाही.

16) दि सिक्युरिटायझेशन आणि रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस अँन्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 अंतर्गत विहित करण्यात आलेल्या नियम/शर्तीच्या आधारे विक्री करण्यात येईल. विक्रीच्या संदर्भात अधिक माहिती /चौकशी जर असल्यास त्यासंबंधी माहिती संबंधित शाखांना संपर्क साधून प्राप्त करता येईल.

17) एकदा केलेली बोली मागे घेतली जाणार नाही किंवा रदद केले जाणार नाही. वापरकर्त्याच्या नोंदणीकृत आयडीवरुन केलेल्या सर्व बिड त्याने/तिने केल्या आहेत असे मानले जाईल.

18) ही सूचना कर्जदार, सह-कर्जदार,जामीनदार आणि सर्वसामान्य जनतेला देखील लागू आहे.

कर्जदार/जामीनदारांना विक्री सुचना

ही नोटीस सिक्युरिटी इंटरेस्ट एनफोर्समेंट रुल 2002, च्या नियम 8(2) अंतर्गत कर्जदार/जामीनदारांना (एल/आर.एस.) हयांनी सदर सूचना त्यांना देण्यात आलेली 30 दिवसांची संवैधानिक विक्री सूचना म्हणून समजण्यात यावी.

माननीय महोदय/महोदया,

निम्न स्वाक्षरीकार हे बँक ऑफ इंडियाचे प्राधिकृत अधिकारी असून सिक्युरिटायझेशन ॲन्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनांशियल ॲसेटस आणि एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट 2002 आणि त्या अंतर्गत तयार करण्यात आलेल्या नियमानुसार त्यांना ही विक्रीची सूचना जारी करण्याचे आणि विक्रीचे अधिकार देण्यात आले आहेत. उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे बँकेद्वारे देण्यात आलेल्या कर्जाच्या संबंधीत थकीत देणी आणि याजासह मासिक दंड, शुल्क आणि मार अनैर यांच भरणा करण्यास असमर्थ ठरले आहात म्हणून बँकेने तुमच्यावर उपरोक्त नमूद रकमेच्या भरणा 60 दिवसांच्या करण्यासाठी कलम 13(2) (अंतर्गत मागणी सूचना जारी करण्यात आली होती. तुम्ही 60 दिवसांच्या मुदतीनंतरही रकमेचा भरणा करुन शकला नाहीत म्हणून प्राधिकृत अधिका-यांना कलम 13(4) (च्या अंतर्गत देण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करुन त्यांनी उपरोक्त परिशिष्ट मध्ये देण्यात आलेल्या सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे. याद्वारे तुम्हास सूचना देण्यात येते कि, विक्रीसाठी निश्चित करण्यात आलेल्या दिनांकाच्या पूर्वी उपरोक्त नमूद रकमेचा भरणा करावा आणि जर असे न झाल्यास मालमत्तेची विक्री करण्यात येईल आणि जर काही शिल्लक असल्यास तुम्ह्याकडून व्याज आणि खर्चासह वसूल करण्यात येईल. कृपया नोंद घेण्यात यावी की, नागणी सूचना, ताबा घेणे, मालमत्तेचे मुल्यांकन आणि विक्री यासाठी झालेल्या सर्व खर्च प्राधिकृत अधिका-यांकडून कळवण्यात येईल आणि प्रथम तो वजा करण्यात येईल आणि विक्री प्रक्रियेतील उर्वरित योग्य भाग उपरोक्त नमूद तुम्ह्या लागू असणा-या देण्यांसाठी वापरण्यात येईल. अटी आणि शर्ती यावर आधारित असलेल्या लिलावामध्ये तुम्ही आवश्यक त्या बयाणा) ईएमडी (रकमेचा भरणा करन सहभागी होऊ शकता.

ठिकाण : वर्धा
दिनांक : 25.06.2026

(कोणत्याही विसंगतीच्या बाबतीत सदर सुचनेची इंग्रजी आवृत्ती अस्सल व ग्राहय मानली जाईल)

प्राधिकृत अधिकारी
बँक ऑफ इंडिया

आजचा लक्षवेधी सामना

जर्मनी वि. इक्वेडोर

- जुलियन नागेल्समन यांच्या मार्गदर्शनाखालील जर्मनी संघाने यंदाच्या विश्वचषक फुटबॉल स्पर्धेत प्रभावी कामगिरी केली आहे. नवव्या कुरासाओच्या (७-१ असा दणदणीत पराभव केल्यानंतर दुसऱ्या सामन्यात त्यांनी आयव्हरी कोस्टवर मिळवलेला विजय विशेष उल्लेखनीय ठरला.
- 'गट ई'मधील अव्वल स्थान आधीच निश्चित झाल्यामुळे, जर्मनीचा संघ आता अखेरच्या साखळी लढतीत इक्वेडोरविरुद्ध राखीव फळीतील खेळाडूंना संधी देऊ शकेल.
- इक्वेडोरचा संघ आयव्हरी कोस्टविरुद्धचा पराभव आणि कुरासाओ संघाविरुद्धची गोलशून्य बरोबरी या निराशाजनक कामगिरीनंतर प्रबंद डडपणाखाली मैदानात उतरेल. स्पर्धेची बाद फेरी गाठायची झाल्यास, त्यांना जर्मनीवर विजय मिळवावा लागेल.
- गेल्या सामन्यात बदली खेळाडू **डेनिझ उंडाव**ने शेवटच्या काही मिनिटांत केलेले दोन जर्मनीसाठी निर्णायक ठरले. आता त्याला सुरुवातीपासून खेळायला मिळू शकेल. घोट्याच्या दुखापतीमुळे बचावपटू निको श्लोटरबेक संघाबाहेर झाल्याने, मलिक थियाव आणि ॲंटोनियो रुडिगर यापैकी एकाला अंतिम ११ खेळाडूंत संधी मिळेल.
- जर्मनीच्या आक्रमक वेगाचा सामना करण्यावी जबाबदारी पाचो, फ्रेंको आणि हिन्कापीए यांच्यावर असेल. तसेच मध्यरक्षक मोइसेस केसेडो आणि आक्रमक एनर व्हेलेन्सियाचे योगदानही महत्त्वाचे ठरेल.

- **वेळ :** मध्यरात्री १.३० वा. (शुक्रवार)
- **थेट प्रक्षेपण :** 'युनाइट ८ स्पोर्ट्स', 'झी ५'

अन्य सामने

- आयव्हरी कोस्ट वि. कुरासाओ **वेळ : मध्यरात्री १.३० वा. (शुक्रवार)**
- ट्युनिशिया वि. नेदरलँड्स **वेळ : पहाटे ४.३० वा. (शुक्रवार)**
- जपान वि. स्वीडन **वेळ : पहाटे ४.३० वा. (शुक्रवार)**
- तुर्कीये वि. अमेरिका **वेळ : सकाळी ७.३० वा. (शुक्रवार)**
- पॅराग्वे वि. ऑस्ट्रेलिया **वेळ : सकाळी ७.३० वा. (शुक्रवार)**

रोनाल्डो, पोर्तुगालचे दिमाखात पुनरागमन

उझबेकिस्तानवर मोठा विजय

इतिहासाचे नवे पान

- यंदाच्या स्पर्धेत लिओनेल मेसी आणि किलियन एम्बाप्पे विक्रम रचत असताना रोनाल्डोने या सामन्यातील कामगिरीने विश्वचषक इतिहासात आपलेही नाव नोंदवले.
- विश्वचषक स्पर्धेत वयाच्या ४१व्या वर्षी गोल करणारा तो केवळ दुसरा खेळाडू ठरला. यापूर्वी कॅमेरुनच्या रॉजर मिलाने ४२व्या वर्षी गोल केला होता.
- तसेच सहा विश्वचषक स्पर्धांत गोल करणारा रोनाल्डो एकमेव खेळाडू ठरला, तसेच विश्वचषक स्पर्धेत पोर्तुगालकडून सर्वाधिक ९० गोल करण्याचाही मान त्याने मिळवला.

वृत्तसंस्था, ह्युस्टन

विश्वचषक फुटबॉल स्पर्धेतील निराशाजनक सुरुवातीनंतर ख्रिस्तियानो रोनाल्डो आणि पोर्तुगाल संघाने दुसऱ्या सामन्यात दिमाखात पुनरागमन केले. एकतर्फी झालेल्या सामन्यात पोर्तुगालने उझबेकिस्तानचा ५-० असा धुव्वा उडवला आणि त्यांच्या स्पर्धेतील आव्हानाला बळकटी मिळाली.

पोर्तुगाल संघाला पहिल्या सामन्यात तुलनेने दुबळ्या डीआर कॉंगो संघाने १-१ असे बरोबरीत रोखले होते. त्यानंतर पोर्तुगाल संघ आणि रोनाल्डोच्या कामगिरीवर बरीच टीका झाली. तसेच ४१ वर्षीय रोनाल्डोविना पोर्तुगाल संघाचा खेळ अधिक बहरेल, असेही मत काही जाणकारांनी व्यक्त केले. मात्र, रोनाल्डोने या टीकाकारांना चोख प्रत्युत्तर दिले.

सामन्याच्या चौथ्या मिनिटाला नुनो मेंडिसच्या क्रॉसवर रोनाल्डोला गोल करण्याची उत्तम संधी चालून आली होती. मात्र, अगदी थोड्या अंतराने तो चेंडूला स्पर्श करण्यात चुकला. मात्र, त्यानंतर दोनच मिनिटांनी जाओ कॅन्सेलोच्या पासवर रोनाल्डोने पोस्टच्या अगदी जवळून गोल केला आणि पोर्तुगालला आघाडीवर नेले. यानंतरही पोर्तुगालच्या आक्रमकांना रोखताना त्यांच्या बचावफळीकडून अनेक चुका झाल्या. १७व्या मिनिटाला मिळालेल्या फ्री-किकवर पोर्तुगालने आघाडी वाढवली.

पोर्तुगालची कल्पकता

पोर्तुगालचा दुसरा गोल संघ नियोजनाच्या कल्पकतेची जाणीव करून देणारा ठरला. रोनाल्डो फ्री-किक घेण्यास तयार झाला, गोलरक्षकासह बचावफळीच नाही, तर अगदी थेट प्रसारण करणारे कॅमेरेही रोनाल्डोवर रोखले गेले होते. मात्र, पंचांनी इशारा देताच जोनवरच हालचाल करून रोनाल्डो थांबला आणि शेजारी उभ्या असलेल्या नुनो मेंडिसने सुरेख किक घेत गोल केला. यानंतर पोर्तुगालला रोखणे उझबेकिस्तानला जमलेच नाही. सामन्याच्या ३१व्या मिनिटाला ब्रूनो फर्नांडिसच्या पासवर रोनाल्डोने वैयक्तिक दुसरा गोल करत संघाची आघाडी तिप्पट केली.

हतबल उझबेकिस्तान

संपूर्ण सामन्यात उझबेकिस्तानला आपला खेळ दाखवताच आला नाही. पूर्वार्धात ३०व्या मिनिटाला 'व्हीएआर'च्या साहाय्याने नाकारलेला गोल वगळता उझबेकिस्तानचे आक्रमणाचे प्रयत्न फिसलेच नाहीत. सामन्याच्या ६०व्या मिनिटाला गोलरक्षक आणि बचावपटूच्या शरीराचा वेध घेत चेंडू त्यांच्याच गोलपोस्टमध्ये गेल्याने पोर्तुगालची आघाडी वाढली. विजय निश्चित झाल्यानंतर पोर्तुगालने बदली खेळाडू मैदानात आणले. सामन्याच